लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्ये विचार एक तात्विक अभ्यास

स्वामी रामानंदन तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या
मानव विज्ञान विद्याशाखांतर्गत तत्त्वज्ञान
विषयातील पीएच.डी पदवीच्या नियोजित
संशोधनासाठी सादर करावाचा आराखडा

संशोधक विधार्थी
बालाजी गंगारम खंदारे
एम.ए. तत्त्वज्ञान
मो. 9975636585
ई.मेल : balajikhandare1971@gmail.com

संशोधन मार्गदर्शक
डॉ. उपाडे जी.एम.
मो. नं : 7030729623
ई - मेल : gmupad20@gmail.com
तत्त्वज्ञान विभागप्रमुख
बी .रघुनाथ महाविद्यालय, परभणी
संशोधन केंद्र : महात्मा बसवेश्वर
महाविदयालय , लातूर.

“लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्येविचार एक तात्विक अभ्यास ”

मानवी विकासाची परंपरा निरंतर चालू असते. त्यातूनच नव समाजाच्या निर्मितीची प्रक्रिया घडत असते. या नव समाजाच्या जडणघडणीत विश्वातील अनेक व्यक्तींनी मोलाचे योगदान दिलेले आहे. भारतात सुद्धा कष्टकरी कामगार, शेतकरी, शेतमजूर, अशा पिडित समाजाच्या उद्धारासाठी बरबटलेल्या समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठणारे सुधारक महाराष्ट्रात निर्माण झाले. काळाच्या पटलावर त्यानी आपले कर्तुत्व सिद्ध केले आहे. परंतु हा विचार चिरंतन राखण्याची व्यवस्था उभी केली ती लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी अण्णाभाऊ साठे यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्या काळात जातीयता ही टोकाची होती अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, विषमता ,अनेक रूढी परंपरांनी समाज होरपळून निघत होता त्यातच इंग्रज सरकारचे राज्य त्यांची कायदेही कामगाराच्या प्रतिकूल होते त्यांचे होणारे शोषण अतिशय विदारक स्वरूपाचे होते अशा ही परिस्थितीमध्ये अनेक समस्याचा सामना करून जीवन जगणे भाग होते भांडवलदार, कारखानदार, सावकार, यांचे प्रस्थ फारच होते. ते गरीब कामगार जनतेचे शोषण करीत होते काही कामगार खेड्यातून शहरात कामाच्या शोधात आले. तर त्यांना काम मिळाले तर दाम हा फारच कमी मिळायचा आणि अशा परिस्थितीमध्येच अण्णाभाऊ साठे यांचा सुद्धा वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास करून कामाच्या शोधात फिरावे लागले त्यांनी पडेल ते काम केले गिरणी कामगार म्हणून काम केले त्यांना मिळणारा पगार हा फार अल्प होता कामाचे अमर्याद तास होणारे शोषण हे सर्व अण्णाभाऊ साठे यांनी सहन केले. लहानपणी शाळा सुटली पण ते समाजाच्या शाळेत शिकले अक्षर ओळख करून त्यांनी स्वअनुभव आणि निरीक्षणाच्या माध्यमातून त्यांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी आपली लेखणी उचलून अनेक कथा, कादंबरी, पोवाडे, लावणी, वगनाट्य, छक्कड, नाटक

, यांच्या माध्यमातून परिस्थिती बदलण्यासाठी अनेक साहित्यकृतीच्या माध्यमातून फार मोठा प्रयत्न केला आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यावर कार्ल मार्क्स ,श्रीपाद अमृत डांगे, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा प्रभाव होता त्यामुळे ते साम्यवादी विचारसरणीशी जोडल्या गेले. काही काळानंतर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित चळवळीकडे ही वळले.त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे की " जग बदल घालूनी घाव सांगून गेले मज भीमराव" एवढेच नाही तर त्यांनी त्यांची " फकीरा " ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली आहे.ते विचाराने आधुनिक होते त्यांनी प्रत्येक कथा कादंबरीमध्ये निसर्गाचे वर्णन केले आहे. त्याचबरोबर सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी कथेमध्ये स्त्री, पुरुष समानता दाखवलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांनी जनतेमध्ये जनजागृती साठी पोवाडे, लावणी, तमाशाच्या माध्यमातून प्रबोधन सुरू केले. पण इंग्रज सरकारने त्यांच्यावर बंदी घातली. तेव्हा त्यांनी शाहीर अमर,शेख , गवाणकर यांनी लालबावटा या नावाच्या कलापथकाच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरूच ठेवले. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांनी फार मोठया प्रमाणात प्रयत्न केला त्यांनी आपल्या मनातील तळमळ ही " माझी मैना गावाकडे राहिली माझ्या जीवाची झालीया काहीली " बेळगाव , धारवाड , निपाणी हे प्रांत महाराष्ट्रात राहवे अशी त्यांच्या मनाची तळमळ होती. गोवा मुक्ती संग्राम, हैदराबाद मुक्तिसंग्राम, यातही त्यांनी भाग घेतला प्रस्तुत संशोधनात त्यांच्या साहित्यातील प्रत्येक प्रांतात आणि परिस्थितीनुरूप त्यांचे तात्विक तत्त्वज्ञान कसे समाज उपयोगी आहे, त्यामध्ये सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक ,समता, बंधुता ,मानवता ,इत्यादी क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी व संपत्तीचे विकेंद्रीकरण करून प्रत्येक समाज घटकास देण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न संशोधनात दर्शविला जाईल या अनुषंगाने या उपरोक्त संशोधन विषय तत्वज्ञानातील एक वैशिष्टयपूर्ण संशोधन ठरावे हाच ध्यास.

समस्या सूत्रण :

प्राचीन काळापासून ते आजतागायत मानव समाजात विविध स्थित्यंतरे घडली. त्या स्थित्यंतरास विचारांचा आधार महत्त्वाचा ठरला. आधुनिक काळातील बहुसंख्य विचारवंतांनी नव समाज निर्मितीस चालना दिली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे त्यातील एक बहुअयामी व्यक्तिमत्व, त्यांच्या विचारातून समाजाला वास्तविकपणे योग्य दिशा मिळाली का ? त्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान हे समाजातील विविध स्तरातील व्यक्तीच्या उपयोगी ठरले का ? त्यांनी प्रतिपादिलेली सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, अध्यात्मिक, इत्यादी विचार नव समाज निर्मितीस उपयुक्त आहेत का ? त्यांचे तत्त्वज्ञान नेमके कोणत्या स्वरूपाचे आहे का ? आजच्या चंगळवादी समाजाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार तारक ठरतील का ? असे विविध प्रश्न निर्माण होतात कोणताही समाज हा नैतिक मूल्यावर आधारित असलेल ती नैतिक मुल्ये प्रदान करण्याचे काम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून घडले आहे का ? ते ज्या समाज घटकाचे प्रतिनिधित्व करतात ते ज्या प्रकारच्या समाजाची निर्मिती करू पाहतात तो समाज कोणत्या मूल्यावर आधारित असेल.ते मूल्य कोणती असतील ? अशा त्या मूल्यांना तात्विक अधिष्ठान आहे का ? अशा प्रकारचे प्रश्न माझ्या मनात सतत भेडसावत होते म्हणून मी “लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्ये विचार एक तात्विक अभ्यास ” विषय संशोधनासाठी निवडला आहे .

* उद्दीष्टये

१) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

२) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्ये निर्धारन करणे.

३) लोकशाहिर आण्णाभाऊ साठे यांच्या विचार मुल्यांची तात्वीक चिकित्सकरणे.

४) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या मुल्ये विचारांचा समाज जिवनातील प्रभाव स्पष्ट करणे.

५) राजकीय दहशतवाद सामाजिक मागसलेपण व शैक्षणिक दारिद्रय यासारखी दूरीते नष्ट करण्यासाठी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे तत्त्वज्ञान कितपत उपयुक्त ठरत ते अभ्यासणे.

गृहितके (गृहितकृत्य) :

१) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्य विचार नव समाज निर्मीस उपयुक्त ठरतात.

२) भारतातील कष्टकरी मागासलेल्या समाजात परिवर्तन घडवून आधुनिक लोकशाही मुल्य दृढ करण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराने केले.

३) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारातून नैतिक दिशा मिळते.

४) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारातून राजकीय दहशतवाद, सामाजिक मागासलेपण, दारिद्रय, विषमता यासारखी दूरीते नष्ट होतात.

५) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारातून सध्यास्थितीतील सामाजिक विषमता,गरीबी, अज्ञान, दारिद्रय इ. समस्या सोडविता येतात.

६) अण्णाभाऊ साठे यांनी लिंगभेद विषमता दुर करून स्त्रियांचे सक्षमीकरण केले.

महत्व :

मानवी समाजामध्ये विविधता आढळून येते मानवाच्या बुद्धीमुळे तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो एका अर्थाने या वेगळेपणातूनच मानवा पुढे वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. असे म्हणता येते, कारण समस्यांची ची जाणीव ही फक्त मानवालाच होऊ शकते. प्रस्तुत संशोधन विषय समाजातील अशा विविध समस्याचे निरूपण करण्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचा ठरतो. आधुनिक काळातील समस्यायुक्त समाजाला विविध क्षेत्रात प्रगतीपथावर नेण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे तत्त्वज्ञान अत्यंत मौलिक ठरते समाजाची होणारी अधोगती राज्यकारभारातील भ्रष्टाचार आणि शैक्षणिक विकलांगता दूर

करण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तत्वज्ञानाची पेरणी आधुनिक समाजात होणे अत्यंत आवश्यक आहे . या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा व गरजेचा ठरतो. तद्वतच समाजातील विविध स्तरातील व्यक्तींना यशस्वी घडविण्यासाठी व त्यांच्यातील आत्मबल , सर्जनशीलता इत्यादी सारख्या अंतर्गत शक्ति वृद्धिगत होण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार महत्त्वाचे आहेत या अनुषंगाने सदरील संशोधन विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

व्याप्ती :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मानवी जीवन समृद्ध करणारे मोठया प्रमाणावर साहित्य निर्मिती केली केली त्यांनी कथा, कादंबऱ्या ,प्रवास वर्णन, पोवाडे, अशा विविध प्रकारच्या साहित्य प्रकारातून मानवी जीवनातील दुःख, दारिद्र्य, उपासमार, सामाजिक, दर्जा, आणि जगण्यातील फ़ोलपणा दाखवण्याचा प्रयत्न करून या निराशावादी जीवनावर मात करून चांगले आत्मविश्वासाचे जीवन कसे जगता येईल हे दाखवून दिले आहे. चांगले जीवन हे मूल्याधिष्ठित असते. चांगला समाज हा मूल्यावर आधारलेला असतो. अण्णाभाऊ साठे यांना अपेक्षित असलेला समाज हा मानवतावादी व लोकशाही मूल्यावर विश्वास असणारा हवा होता. हे त्यांच्या साहित्यातील नायक, नायिका यांच्यावरून दिसून येते.म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी केवळ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्य विचार एवढया पर्यंतच संशोधनाची मर्यादा असेल इतर विचारवंताचा ही परामर्श विचारात घेतला जाईल पण प्रत्यक्ष भर हा अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावरच असेल.

संशोधन पद्धती :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाजाच्या विविध क्षेत्रातील जाणीव विशद करणारे विपुल लेखन केले आहे. त्यांच्या लेखनात मानवी जीवन समृद्ध

करणारे मूल्यात्मक विचार दिसून येतात.ते विचार मानवी जीवन व्यापून टाकणारे आहेत म्हणून त्यांच्या विचारांची स्पष्टता आणि सामाजिक भूमिका स्पष्ट होणे आवश्यक वाटते . म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक व स्पष्टीकरणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे . सदरील संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ आणि प्राथमिक साधने व दुय्यम साधनाचा वापर करण्यात येणार आहे

प्राथमिक साधने :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या मूळ ग्रंथाचे अवलोकन
अण्णाभाऊ साठे यांचे स्मृतिस्थळातील अवशेषाचे अवलोकन

दुय्यम साधने :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ तसेच सामाजिक ,राजकीय, शैक्षणिक, विचारांचा परामर्श प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथाचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नियतकालिके, मासिके, विविध लेख यांचाही वापर करण्यात येणार आहे.त्याचबरोबर मुलाखत तंत्राचा ही वापर करण्यात येईल .

प्रकरणनिहाय मांडणी : (प्रकरणाची रूपरेषा)

प्रकरण

१) अण्णाभाऊ साठे यांचे जीवनचरित्र

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म ०१ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव ता.वाळवा जि.सांगली येथे एका गरिब कुटूंबात झाला. त्यांचे शिक्षण प्रतिकुल परिस्थीतीमुळे व विषमतावादी स्पृश-अस्पृश्यता, जातीयता यामुळे दिड दिवसातच शाळा सोडावी लागली त्यांनी समाजाच्या अनौपचारिक शिक्षण पध्दतीच्या माध्यमातून ते शिकले अतिशय काबाडकष्टाचे जीवन त्यांच्या वाटयाला आले, ते त्यांनी समर्थपणे पेलले.

(२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे चिंतनविश्व

स्वनिरीक्षण करून व वास्तववादी अनुभवाच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या साहित्याची निर्मीती केलेली आहे. यामध्ये ग्रामिण, शहरी , जीवनातील विषमता, दारिद्रय, अज्ञान, दुःख अशा अनेक या कादंबन्यांच्या माध्यमातून कामगाराचे होणारे शोषण, स्त्रीयांवर होणारे अन्याय यांचे चित्रण त्यांनी साहित्यातुन केले आहे. त्यांना समताधिष्ठित, न्याय, बंधूता या मुल्यावर आधारीत समाज निर्माण करावयाचा होता. त्यांचे संयुक्त महाराष्ट्र एकीकरणातून रशियाच्या प्रवास वर्णनातून दिसून येते.

३) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक तत्त्वज्ञान :

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक तत्वज्ञान फार महत्वाचे होते. त्यांनी त्यांच्या साहित्यातून सामाजिक समता सामाजिक विकास सर्वाप्रती समान दृष्टीकोनातून सामाजिक हिताचे सर्वांगीन प्रगतीचे मुल्ये समाजात रुजविण्याचा अथक प्रयत्न केला आहे.

४) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्रीविषयी विचार:

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांनी त्याच्या साहित्यातून स्त्री बाबतीत अतिशय संवेदनशिल अनेक कथा, कादंबऱ्यातून स्त्री सक्षमपणे, निर्भीडपणे त्यांचे व्यक्तीमत्व उभे केले आहे. आणि त्यांच्यामुळे कुटुंबाची सर्वस्वी जबादारी घेउन बऱ्याच कथा कादबरी मध्ये स्त्रिनी कुटुंब सावरलेले आहे.

5) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादी

मुल्ये :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे सर्व मानवी कल्याणासाठीच आहे कथा ,कादंबरीतील स्त्री, पुरुष विविध नाती कुटुंबातील सामंजस्य पूर्वीच्या काळातील माणूसपण अनेक पात्राच्या माध्यमातून दिसून येते.

उदाहरणार्थ : “फकीरा” उपकाराची फेड,बुद्धांची शपथ अशा विविध माध्यमातून मानवतावादी मुल्ये दिसून येतात .

निष्कर्ष :

वरील सर्व प्राप्त झालेल्या संकलनानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्यविचार एक तात्विक अभ्यास या मधून त्यांच्या तत्वज्ञानाचा समन्वय निष्कर्ष वरील प्रकरणात मांडले जाणार आहे.

संदर्भ ग्रंथसूची

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील कथा कादंबरी यांची यादी व इतर लेखकांचे साहित्य

फकीरा	वारणेचा वाघ
वारणेचा	भुताचा मळा
स्मशानातील सोने	माकडीचा माळ
सोनवडीची सोना	चंदन
खेळखंडोबा	तमासगीर
माझे माहेर वाघदरा	काडीमोड
पिराजीची भानगड	नवती
चिकलातील कमळ	जिव्हाळा
चोरांची संगत	कोंबडी चोर
सापळा	मास्तर
बंडवाला	गुलाम
चिली	मरीआईचागाडा
आवडी	पैलवानाचा गाव
जोगीन	अक्कलेचीगोष्ट
माझी मुंबई	जिवंतकाडतुस
चित्रा	गुल
निखार	रक्ताचाटिळा
खेड्यातील हाड	पाझर
फरारी	अलगुज
कुळवाडी	माझा रशियाचा प्रवास
बर्निंग चा पोवाडा	

इतर लेखी :

१) अण्णाभाऊ साठे सांगून गेले : विलास रणसुभे.

२) अण्णा साठे यांचे बाल वाङ्मय : बाबुराव गुरव.

३) अण्णाभाऊ साठे विचारधन : विजयकुमार जोंधळे, नालंदा प्रकाशन.

४) अण्णाभाऊ साठे लिखित समीक्षा : डॉ.श्रीपाल सबनीस.

५) अण्णाभाऊ साठे समग्र वाङ्मय : महाराष्ट्रा राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मराठी भाषा विभाग.

६) अण्णाभाऊ साठे साहित्य आणि तत्वज्ञान : डॉ. सोमनाथ कदम.

७) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे : डॉ. नागोराव कुंभार (संपादक) विचारशलका प्रकाशन लातूर

८) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्य दर्शन : चंद्रकांत वानखेडे , संकेत प्रकाशन नागपुर.

संशोधक

बालाजी गंगाराम खंदारे

एम. ए. तत्त्वज्ञान

मो ९५७५६३६५८५

संशोधक मार्गदर्शक

डॉ. उपाडे जी. एम.

मो : 7030729623